राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागांतर्गत

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित.

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरगाव (पूर्व), मुंबई-४०००६५

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

नागरिकांची सनद

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनिमयन व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ८(१) (२) मधील तरतुदीनुसार.

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी व राज्य शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी महामंडळांतर्गत खालील विभाग कार्यरत आहेत.

१) प्रशासन विभाग

२) वित्त व लेखा विभाग

३) कलागारे विभाग

४) अभियांत्रिकी विभाग

५) विद्युत विभाग

६) सुरक्षा विभाग

७) भांडार विभाग

८) कंपनी सचिव कार्य विभाग

९) एक खिडकी योजना

महामंडळाच्या संचालक मंडळाची रचना खालीलप्रमाणे आहे.

अध्यक्ष - मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य

उपाध्यक्ष - मा.राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य

सदस्य - मा.प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य

सदस्य - व्यवस्थापकीय संचालक, दादासाहेब फाळके चित्रनगरी

सदस्य - संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय

सदस्य - अशासकीय सदस्य

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६५



महामंडळाचा रचनात्मक तक्ता

संचालक मंडळ ↓							
व्यवस्थापकीय संचालक ↓							
सह व्यवस्थापकीय संचालक (श्री. प्रशांत साजणीकर)							
↓ मुख्य प्रशासकीय अधिकारी श्रीम. गीता देशपांडे	↓ वित्तीय सल्लागार आणि मुख्य लेखाधिकारी श्रीम.चित्रलेखा खातू	↓ व्यवस्थापक कलागारे श्री.संतोष खामकर	↓ उप अभियंता (विद्युत) श्री.अनंत पाटील	↓ उप अभियंता (स्थापत्य) श्री.विजय बापट	↓ मुख्य सुरक्षा अधिकारी श्री.अनिल माने	↓ कंपनी सचिव (रिक्त)	↓ सिंगल विंडो समन्वयक श्री. मुकेश भारद्वाज
सहाय्यक प्रशासकीय अधिकारी जनसंपर्क अधिकारी	अंतर्गत लेखा परिक्षक अधिकारी अधीक्षक (भांडार)	सहा. व्यवस्थापक (कलागारे)	सहाय्यक अभियंता	सहाय्यक अभियंता	सुरक्षा अधिकारी	कंपनी सचिव	सिंगल विंडो

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ
मर्यादित दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६५

कंपनी अधिनियम १९५६ अंतर्गत महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाची स्थापना दि.२६.०९.१९७७ रोजी झाली असून पूर्वीच्या महाराष्ट्र सांस्कृतिक विकास महामंडळाची स्थावर मालमत्ता व योजना या महामंडळाकडे हस्तांतरित झाल्या आहेत. महामंडळाच्या कार्याकरिता सुपूर्द करण्यात आलेली गोरेगाव पूर्व, मुंबई-४०० ०६५ येथील आरे डेअरीच्या जमिनीस लागून असलेली सुमारे ५२१ एकर जमीन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या नावे हस्तांतरित करण्यात आली आहे. या जागेत एकूण १६ कलागारे व सुमारे ७० बाह्यचित्रिकरण स्थळे आहेत.

महामंडळात शासनाने ३० सप्टेंबर २००९ रोजी मंजूर केलेल्या आकृतिबंधानुसार २४९ पदे असून यातील १८ पदे त्या पदांवर कार्यरत असलेले कर्मचारी सेवानिवृत्त होईपर्यंतच मंजूर राहातील. तद्नंतर ही पदे आपोआप व्यपगत झाली असून महामंडळातील आस्थापनेवर सध्या २३१ पदे मंजूर आहेत. या पदांपैकी ६२ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

महामंडळाची स्थापना खालील उद्दिष्टांची पूर्तीसाठी करण्यात आली आहे.

१. सिनेमा, रंगभूमी व सांस्कृतिक विकासासाठी विशेष प्रयत्न करणे.

२. मराठी चित्रपटांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करणे, त्यासाठी सर्वतोपरी मदत करणे, अर्थसहाय्य देणे.

३. महत्वाच्या शहरांमध्ये चित्रपटगृहांसारख्या, नाटयगृहासारख्या वाणिज्यिक तत्वावरील सोयी पुरवून त्या माध्यमातून प्रादेशिक चित्रपटांना कला विकासाला चालना देणे.

४. चित्रपटांच्या निर्मितीसाठी जास्तीत जास्त सुविधा केंद्रीकृत पध्दतीने उपलब्ध करुन देणे व चित्रीकरणासाठी सुरक्षित वातावरण पुरविणे.

महामंडळाचे विभागवार कामकाज

पर्यवेक्षक अधिकारी	विभाग व विभाग प्रमुख	विषय
सह व्यवस्थापकीय संचालक श्री. प्रशांत सांजणीकर	**प्रशासन विभाग** मुख्य प्रशासकीय अधिकारी श्रीम. गीता देशपांडे	कर्मचारी भरती, पदोन्नती प्रकरणे, वेतननिश्चिती, रजा प्रकरणे, विविध कारणास्तव अग्रीम प्रकरणे, विभागीय बदली प्रकरणे, शिस्तभंगविषयक प्रकरणे, अनुकंपा प्रकरणे, वैद्यकीय प्रतिपूर्ती, जनसंपर्क विषयी, धोरणात्मक निर्णय, औद्योगिक व कामगार न्यायालयातील आस्थापनाविषयक न्यायालयीन प्रकरणे, विभागीय चौकशी प्रकरणे, नविन चित्रपटगृह बांधणीसाठी बिनव्याजी कर्ज योजना, दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीस अर्थसहाय्य योजना, कामगार संघटनांच्या मागण्या,
	कलागारे विभाग व्यवस्थापक (कलागारे) श्री. संतोष खामकर	मागणीनुसार बाहय चित्रीकरण स्थळांच्या व कलागारांची आरक्षण देणे, दीर्घ मुदतीचे आरक्षणाचे करार करणे, मेकअप रुम्स आरक्षण देणे, चित्रीकरणाकरिता आवश्यक सुविधा संबंधितांना मिळतील याकरिता आवश्यक कार्यवाही करणे. निर्माते, कलाकार, कामगार यांच्या संपर्कात राहून त्यांच्या अडीअडचणींची व अपेक्षांची माहिती घेणे, अडचणी तात्काळ सोडविण्याचा प्रयत्न करणे. जास्तीत जास्त चित्रीकरणे आकर्षित करण्याचा प्रयत्न करणे, चित्रीकरण स्थळांचे भाडे वसुली करणे व महामंडळाचे उत्पन्नात वाढ करणे इत्यादी.
	लेखा विभाग वित्तीय सल्लागार आणि मुख्य लेखा अधिकारी श्रीम. चित्रलेखा खातू	सर्व प्रकारचे लेखा विषयक व लेखा परिक्षण विषयक बाबी, वेतननिश्चितीनुसार थकबाकीचे प्रदान, भत्ते, सेवाकर, आयकर विषयक बाबी, भागभांडवल, वाहन विषयक बाबी, लाभांशविषयी.
	भांडार विभाग वित्तीय सल्लागार आणि मुख्य लेखा अधिकारी श्रीम. चित्रलेखा खातू	चित्रीकरणासाठी भाडयाने मागणी असणारे साहित्य खरेदी व अभिरक्षा करणे, सर्व विभागांचे दैनंदिन कामकाज चालू राहण्यासाठी आवश्यक गोष्टींची खरेदी व वार्षिक मेंटेनन्स पाहणे, अभियांत्रिकी स्थापत्य व विद्युत विभाग वगळता इतर विभागांकरिता खरेदी प्रक्रिया पूर्ण करणे.
	अभियांत्रिकी विभाग (स्थापत्य.) उप अभियंता (स्थापत्य) श्री.विजय बापट	चित्रनगरी परिसरामध्ये चित्रनगरीकरिता आवश्यक बांधकामे करणे. चित्रनगरीने विहित पध्दतीने बाहय संस्थांना येथे बांधकाम करण्याची परवानगी दिल्यास त्यासंबधी करार इ. सर्व कार्यवाही पूर्ण करणे, परिसरातील स्वच्छतेबाबत, चित्रनगरीच्या बांधकामाची दैनंदिन देखभाल पाहणे, चित्रनगरी परिसरामध्ये पाणीपुरवठयाची व सांडपाण्याची व्यवस्था निर्माण करणे व त्याची देखभाल करणे, कलागारे तसेच महामंडळाच्या अन्य स्थावर मालमत्तेचा विमा चित्रनगरीमध्ये रस्ते इ. मुलभूत सुविधा निर्माण करणे व त्याची उत्तम देखभाल ठेवणे.
	विद्युत विभाग उप अभियंता श्री. अनंत पाटील	चित्रनगरीतील विद्युत पुरवठा, विद्युत संयंत्राची व प्रामुख्याने वातानुकूलन यंत्रणा खरेदी, दूरध्वनी सेवांविषयक, उभारणी, देखभाल करणे, विद्युत जोडण्या देणे.
	सुरक्षा विभाग मुख्य सुरक्षा अधिकारी श्री. अनिल माने	चित्रनगरी परिसरामध्ये कायदा व सुव्यवस्था राखणे. चित्रनगरीतीच्या सर्व मालमत्ताचे संरक्षण करणे. चित्रनगरीच्या जमिनीवर अतिक्रमणे होणार नाहीत याची दक्षता घेणे.
	कंपनी कार्य विभाग कंपनी सचिव (रिक्त)	महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीविषयी सर्व कामकाज करणे, ROC कडे विविध Retirms film करणे. CSR फंड विषयी कार्यवाही करणे.

महामंडळामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा				
अ.क्र	**सेवांचा तपशील**	**सेवा पुरविणारे अधिकारी/ कर्मचारी यांचे नाव व हुद्दा**	**सेवा पुरविण्याची विहित मुदत**	**सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नाव व हुद्दा**
१	मागणीनुसार बाहय चित्रीकरण स्थळांच्या व कलागारांची आरक्षण देणे, दीर्घ मुदतीचे आरक्षणाचे करार करणे, मेकअप रुम्स आरक्षण देणे, चित्रीकरणाकरिता आवश्यक सुविधा संबंधितांना मिळतील याकरिता आवश्यक कार्यवाही करणे. निर्माते, कलाकार, कामगार यांच्या संपर्कात राहून त्यांच्या अडअडचणींची व अपेक्षांची माहिती घेणे, अडचणी तात्काळ सोडविण्याचा प्रयत्न करणे. जास्तीत जास्त चित्रीकरणे आकर्षित करण्याचा प्रयत्न करणे. चित्रीकरण स्थळांचे भाडे वसुली करणे व महामंडळाचे उत्पन्नात वाढ करणे इत्यादी.	व्यवस्थापक (कलागारे)	१ ते ३० दिवस किंवा प्रकरणाच्या व्याप्तीनुसार	श्री. प्रशांत साजणीकर सह व्यवस्थापकीय संचालक
	चित्रपट निर्मिती संस्था यांना मागणी केल्यानुसार कलागारे तसेच बाह्य चित्रीकरण स्थळांचे आरक्षण देणे, मेक-अप रुम्स आरक्षण देणे		१ ते ७ दिवस	
२	एक खिडकी योजनेतंर्गत चित्रनगरी व्यतिरिक्त इतर चित्रिकरण स्थळांचे आरक्षण.	उप व्यवस्थापक (नियोजन व विकास)	१ ते १५ दिवस किंवा प्रकरणाच्या व्याप्तीनुसार	

टीप :- उपरोक्त सेवा ही सर्वसाधारण जनतेसाठी नसून चित्रपट/मालिकांचे चित्रीकरण करणाऱ्या संस्थांसाठीच असल्याने लोकसेवा हमी कायद्यांतर्गत या सेवेचा समावेश करण्यात आलेला नाही.

महामंडळामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सुविधा

१. दादासाहेब फाळके चित्रनगरी महामंडळात १६ कलागारे असून, ७० हून अधिक बाह्य चित्रीकरण स्थळे यावर चित्रपट, दूरदर्शन मालिका तसेच विविध कंपन्यांच्या जाहिरातींचे चित्रीकरण करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. निर्माते चित्रीकरण स्थळाचे आरक्षण महामंडळाच्या www.filmcitymumbai.org या संकेतस्थळावर निर्माते ऑनलाईनद्वारे करु शकतात. उपलब्ध असलेल्या कलागारामध्ये इनडोअर चित्रिकरण तसेच बाह्यचित्रिकरण स्थळावर आऊटडोर चित्रिकरण करु शकतात. त्याचप्रमाणे प्रत्यके कलागारांची उंची क्षमता तसेच चित्रिकरण स्थळांचे दर इत्यादी बाबी संकेतस्थळावर दर्शविण्यात आल्या आहेत. तसेच दूरध्वनी क्र. ७७३८८२६१८६ असा आहे.

२. चित्रिनगरीत येणाऱ्या कामगारांसाठी कलागारे तसेच बाह्यचित्रिकरण स्थळावर शौचालय, पिण्याचे पाणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

३. एक खिडकी योजना अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रभर आरक्षण करण्यासाठी संकेतस्थळ www.filmcell.maharashtra.gov.in/sws/ या संकेतस्थळावर निर्माते ऑनलाईनद्वारे आरक्षण करु शकतात. (दादासाहेब फाळके चित्रनगरीतील चित्रिकरणस्थळे वगळता.)

४. महामंडळाच्या परिसरात बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अग्नीशमन यंत्रणा २४X७ उपलब्ध असते.

५. चित्रनगरीत येणाऱ्या कलाकार/तंत्रज्ञ/कामगार यांच्याकरीता एटीएमची सुविधा स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्यामार्फत करण्यात आली आहे.

६. चित्रनगरीत येणाऱ्या कलाकार/तंत्र/कामगार यांचे संरक्षण व्हावे याकरीता महाराष्ट्र सुरक्षा मंडळ यांच्याकडून सुरक्षा रक्षक, बंदुकधारी सुरक्षा रक्षक इत्यादींच्या सेवा घेण्यात आल्या आहेत.